WWW.LOKSATTA.COM
मुंबई, गुरुवार, २८ एप्रिल २०२२ ★



### तीन महिन्यांत अहवाल सादर करण्याचा आदेश

# तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा करण्यासाठी समिती नियुक्त



**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्यातील विद्यापीठांअंतर्गत पदवी अभ्यासक्रमांमध्ये बदल करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तज्ज्ञ समिती नियुक्त केली आहे. त्यानुसार तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा करण्यासाठीची योजना आणि आराखडा, राज्यभरात एक समान शैक्षणिक अभ्यासक्रम आराखडा, सामान्य अध्यापनशास्त्राऐवजी विधायक अध्यापन शास्त्राचा वापर, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वैयक्तिकृत शिक्षणाचा आराखडा तयार करण्यात येणार असून त्यासाठी समितीला तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करून राज्यात अंमलबजावणी करण्याबाबतचा अहवाल ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या समितीने राज्य शासनाला सादर केला. तातडीने हाती घ्यावयाचा किंवा किमान संसाधने आवश्यक असलेला कार्यक्रम, मध्यम मुदतीचा किंवा मध्यम संसाधने आवश्यक असलेला कार्यक्रम, दीर्घकालीन किंवा मोठी गुंतवणूक आवश्यक असलेला कार्यक्रम या स्वरुपात समितीने केलेल्या शिफारसींचे वर्गीकरण करण्यात आले. त्या अंतर्गत तीन वर्षांचा अभ्यासक्रम चार वर्षांच्या अभ्यासक्रमाकडे स्थलांतर करण्याची योजना आणि आराखडा तयार करणे, त्यासोबतच राज्यभरात एक समान शैक्षणिक अभ्यासक्रम आराखडा तयार करणे, सामान्य अध्यापन शास्त्राऐवजी विधायक अध्यापन शास्त्राचा वापर करणे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, वैयक्तिकृत शिक्षणाचा आराखडा तयार करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रसिद्ध केला आहे. मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, मुंबई विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. अजय भामरे, मुंबई विद्यापीठाचे प्रा. राजेश खरात, नांदेड विद्यापीठाचे डॉ. एल. एम. वाघमारे, डॉ. अजय टेंगसे आदी २१ सदस्यांचा समावेश आहे.

**समितीची कार्यकक्षा**

- चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रमासाठी अध्यापन पद्धती आणि परीक्षेसाठी समग्र योजना तयार करण्यासह प्रात्यक्षिक आणि प्रकल्प अभ्यास, मुख्य आणि वैकल्पिक विषयांअंतर्गत आणि बहिःस्थ प्रद्धतीने मूल्यमापन, गुणांकन आणि श्रेयांक पद्धती समाविष्ट असणे.
- चार वर्षे पदवी अभ्यासक्रमात तयार राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मापदंड विचारात घेऊन अभ्यासक्रमात समाविष्ट केलेल्या प्रत्येक विषयाची निश्चित उद्दिष्टे परिणामांसह नमूद करणे.
- चार वर्षे पदवी अभ्यासक्रमासाठी प्रत्येक वर्षाची किमान कौशल्य पातळीसंदर्भात निश्चित मार्गदर्शक सूचना करणे.
- विद्यार्थ्यांना स्वप्रेरणेने ज्ञान संपादन करता येईल, नवोन्मेषी आणि सृजनशील संशोधक निर्माण होतील या दृष्टीने अभ्यासक्रमाचे स्वरूप निश्चित करणे. अभ्यासक्रम बहुविद्याशाखीय आणि संशोधनपर आधारित राहण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना करणे.
- चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या संशोधन घटक आणि औद्योगिक प्रशिक्षणासाठीच्या सूचना देणे, स्वयंरोजगारभिमुख आणि व्यवसायभिमुख अभ्यासक्रमांसाठी सूचना करणे.
- चार वर्षे अभ्यासक्रमाची एक समान शैक्षणिक संरचना निर्धारित करण्यासाठी आराखडा तयार करणे, त्यात मल्टिपल एन्ट्री मल्टिपल एक्झिट, श्रेयांक हस्तांतरण या संदर्भात शैक्षणिक संरचना ठरवणे.

# नव्या अभियांत्रिकी संस्था उघडण्यास दोन वर्षे बंदी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** गेल्या काही वर्षांपासून देशात अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील जागा मोठ्या प्रमाणात रिक्त राहत असल्याने आणखी दोन वर्षे नवीन अभियांत्रिकी संस्था उघडणे आणि वाढीव जागा देण्यावर अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) बंदी घातली आहे, अशी माहिती 'एआयसीटीई'चे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी दिली. सोमवारी नागपुरात आले असता ते पत्रकारांशी बोलत होते.

देशात अभियांत्रिकी महाविद्यालयांचे मोठ्या प्रमाणात पीक आल्याने दरवर्षी लाखो जागा रिक्त असतात. २०२० मध्ये देशातील २५ लाख ३९ हजार जागांवर केवळ १४लाख १० हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. २०२१ मध्येही २४ लाख ४२ हजार जागांवर केवळ १२ लाख ७५ हजार विद्यार्थ्यांची नोंदणी होती. रिक्त जागांमुळे अभियांत्रिकी महाविद्यालयांसमोरही मोठे संकट उभे ठाकले होते. परिणामी, संस्थांच्या दर्जामध्येही घट झाली होती. त्यामुळे 'एआयसीटीई'ने अभियांत्रिकी महाविद्यालयांसदर्भात यापुढील दोन वर्षे नवीन अभियांत्रिकी संस्था उघडण्यास आणि जागा वाढवून देण्यास बंदी घालण्यात आली आहे.

**तीन अटींवर संस्थांना सवलत...**

गेल्या काही वर्षांत अभियांत्रिकीमधील पाचशेहून अधिक महाविद्यालये बंद करण्यात आली. दरवर्षी ही संख्या वाढत आहे. त्यामुळे नवी महाविद्यालये आणि वाढीव जागा देण्यावर बंदी

**'ब्रिज कोर्स'चा लाभ**

विद्यार्थ्यांना अनेकदा पालकांच्या दडपणामुळे या अभ्यासक्रमात प्रवेश घ्यावा लागतो. नंतर ते मध्येच शिक्षण सोडतात. त्यामुळे त्यांना पदवी मिळत नाही. नव्या शैक्षणिक धोरणात अशा विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. मात्र, त्यासाठी अशा विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम सोडताना त्यांच्या आवडीचा 'ब्रीज कोर्स' देण्यात येणार आहे. तो पूर्ण केल्यावर त्यातून नोकरीची संधी असेल. याशिवाय पुढील आठ वर्षांत पुन्हा या अभ्यासक्रमात प्रवेश घ्यायचा असल्यास नव्याने सुरुवात करण्याची गरज राहणार नाही. 'ब्रीज कोर्स'च्या समोरच्या अभ्यासक्रमचा पर्याय स्वीकारता येईल, असेही सहस्त्रबुद्धे यांनी स्पष्ट केले.

# कट्टरपंथीय, राजकारण्यांकडून देशात धार्मिक द्वेष !

### मुस्लीम राष्ट्रीय मंचचे अध्यक्ष इंद्रेश कुमार यांचे वक्तव्य

**नागपूर :** देशातील काही कट्टरपंथीय समाजात दुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न करतात तर काही राजकारणी धर्मांमध्ये तेढ निर्माण करतात, असे वक्तव्य मुस्लीम राष्ट्रीय मंचचे अध्यक्ष व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक इंद्रेश कुमार यांनी केले.

मुस्लीम राष्ट्रीय मंचच्यावतीने बुधवारी नागपुरातील टेका नाका येथे आयोजित इफ्तार पार्टीसाठी इंद्रेश कुमार नागपुरात आले असता ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. भारतातील हिंदू असो वा मुस्लीम, आपण भारतीय आहोत हे समजून देशात एकत्रित राहून बंधुभाव वाढवण्यासाठी पुढे येण्याची गरज आहे. गेल्या काही वर्षात जाती-धर्मामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न काही राजकारणी करत आहेत. त्यांनी हे उद्योग बंद करावे. एकत्र काम करावे.

EXPRESS Careers

SBI
भारतीय स्टेट बँक
केंद्रीय भरती व पदोन्नती विभाग, कॉर्पोरेट सेंटर, मुंबई
दूरध्वनी: ०२२-२२८२०४२७; फॅक्स: ०२२-२२८२०४११

कंत्राटी तत्त्वावर विशेषज्ञ संवर्ग अधिकारी भरती

कंत्राटी तत्त्वावर खालील पदांसाठी भारतीय नागरिकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु क्र. | पद | श्रेणी | रिक्त जागा | जाहिरात क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य माहिती सुरक्षा अधिकारी | कंत्राटी | ०१ | सीआरपीडी/एससीओ-सीआयएसओ/२०२२-२३/०४ |

पात्रता निकष (वय, अर्हता, अनुभव इत्यादि), आवश्यक शुल्क आणि इतर तपशील उपरोक्त विस्तृत जाहिरात क्रमांकांतर्गत बँकेच्या वेबसाईटवर https://bank.sbi/web/careers किंवा https://www.sbi.co.in/web/careers येथे ऑनलाईन अर्ज दाखल करण्याच्या व ऑनलाईन अर्ज शुल्क प्रदान करण्याच्या लिंक सह उपलब्ध आहेत. उमेदवारांना सल्ला दिला जातो की त्यांनी सविस्तर जाहिरात बघून आपली पात्रता आणि इतर तपशील यांची अर्ज करण्यापूर्वी व शुल्क भरण्यापूर्वी खात्री करून घ्यावी.

- **ऑनलाईन अर्ज भरण्याची व शुल्क भरण्याची तारीख : २७.०४.२०२२ ते १७.०५.२०२२**

काही शंका असल्यास, कृपया आम्हाला **"CONTACT US"** → **"Post Your Query"** या लिंकद्वारे लिहा, जी बँकेची वेबसाईट वर उपलब्ध आहे.

**स्थान:** मुंबई
**दिनांक:** २७.०४.२०२२

**महाव्यवस्थापक**
**(आरपी आणि पीएम)**

ANJUMAN-I-ISLAM'S
A. R. KALSEKAR
POLYTECHNIC, NEW PANVEL
ISO 9001:2015 certified
Vision : To be the most sought-after Polytechnic that others would wish to emulate. | Mission : Creating Exuberant Technical Professionals

**RECRUITMENT DRIVE**

Applications are invited from eligible candidates for the post of **LECTURERS and LAB ASSISTANT** on Ad-hoc basis for the academic year 2022-23 for the following Programme / Branches

| Sr. No. | Programme / Subject | Lecturer | Lab Assistant | Eligibility | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Lecturer | Lab Assistant |
| 1 | Artificial Intelligence & Machine Learning | 02 | 00 | B.E. Computer/ IT with Min. First Class | .... |
| 2 | Computer Engineering | 02 | 01 | B.E. Computer/ IT with Min. First Class | Dip in Computer OR B.Sc. IT with Min. First Class |
| 3 | Physics | 01 | 00 | M.Sc. Physics with min. First Class | .... |

Eligibility, Qualifications and Experience as per AICTE / DTE / MSBTE Norms. All the eligible and interested candidate can submit your resume and all the relevant documents at admin@aiarkp.ac.in or principal.aiarkp@gmail.com or you can post to **HON. EXE. CHAIRMAN, ANJUMAN-I-ISLAM'S A. R. KALSEKAR POLYTECHNIC** Plot No. 2 & 3, Sector 16, Near Thana Naka, Khandagaon, New Panvel Tal.- Panvel, Dist. Raigad- 410 206 within 15 days from the publication of this advertisement.

**Note: Mail should be of one single PDF contain all the relevant documents**

**Dr. Zahir I. Kazi** Hon. President, A.I. | **Mr. G.A.R. Shaikh** Hon. Gen. Secretary, A.I. | **Mr. Burhan Harris** Hon. Exe-Chairman, BINM

Bharatiya Vidya Bhavan's

लोकसत्ता
(https://epaper.loksatta.com/)

9/36

Advertisement

Suggested Clipped Articles

लोकसत्ता (https://epaper.loksatta.com/)





(https://epaper.loksatta.com/c/67704734)



# राजकीय लेखक डॉ. न. गो. राजुरकर यांना महात्मा गांधी पुरस्कार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** महात्मा गांधी व पं. नेहरूंच्या वैचारिक व राजकीय भूमिकांचे विश्लेषण करणारे प्रसिद्ध लेखक व वक्ते डॉ. न. गो. राजुरकर यांना महात्मा गांधी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विविध क्षेत्रांत सातत्यपूर्ण काम करणाऱ्या मान्यवरांचा १९८५ पासून सन्मान करणाऱ्या 'कॅपिटल फाऊंडेशन सोसायटी'च्या वतीने प्रा. नरसिंह राजुरकर यांच्यासह माजी केंद्रीय निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश मदन लोकूर, न्या, जी. रघुराम, ज्येष्ठ पत्रकार शेखर गुप्ता, कोटक महिंद्र बँकेचे संस्थापक उदय कोटक, केरळचे राज्यपाल अरिफ महमद खान, माजी खासदार मुरलीधर भंडारे, सिरिल श्रॉफ आदींचाही सन्मान करण्यात आला. २०२० मधील पुरस्कारांचे वितरण नुकतेच दिल्लीत झाले. हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठात तीन दशकांहून अधिक काळ प्राध्यापक राहिलेले प्रा. राजुरकर यांनी स्वातंत्र्यसंग्राम, भारताची फाळणी, नेहरूंचे राजकारण, गांधी विचार आदी विषयांवर १३ ग्रंथ लिहिले आहेत.

(https://epaper.loksatta.com/c/67711592)



नागपूर - मुंबई समृद्धी महामार्ग

# पहिल्या टप्प्यात ५२० किमीचा मार्ग खुला?

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गाच्या कामादरम्यान वन्यजीवांसाठी बांधण्यात आलेल्या उन्नत मार्गाचा भाग कोसळला आणि नागपूर ते शेलू बाजार, वाशिम अशा २१० किमीच्या मार्गाचे लोकार्पण रद्द करण्यात आले. आता नव्याने या उन्नत मार्गाची बांधणी करण्यात येत असून हे काम पूर्ण होण्यासाठी दीड ते दोन महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. यादरम्यान नागपूर ते शिर्डी अशा सलग ५२० किमीच्या मार्गातील अपूर्ण कामे वेगाने पूर्ण करत एकाच वेळी हा ५२० किमीचा मार्ग वाहतुकीस खुला ... (एमएसआरडीसी) विचाराधीन आहे.

मुंबई ते नागपूर हे अंतर केवळ आठ तासांत पार करता यावे यासाठी ... महामार्ग बांधण्यात येत आहे. हा प्रकल्प रखडला असून २०२१ मध्येच मार्ग वाहतूक सेवेत दाखल होणे अपेक्षित होते. टप्प्याटप्प्याने ... ते तीन महिन्यांत खुला करण्याच्या दृष्टीने एमएसआरडीसीचा विचार सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. एमएसआरडीसीचे ... मात्र यासंबंधीचा अंतिम निर्णय झाला नसून लवकरच निर्णय घेऊ, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता २१० किमीऐवजी ५२० किमीचा ...

**...खर्च कंत्राटदाराकडून**

समृद्धी मार्गाच्या पॅकेज १ मध्ये नागपूरपासून १५ किमी अंतरावर मेघा इन्फ्रास्ट्रक्चर इंजिनीअरिंग लिमिटेड या हैदराबादस्थित कंपनीकडून उन्नत मार्गाचे काम करण्यात येत होते. हे काम ३० मे रोजी पूर्ण होणार होते. सुपर स्ट्रक्चर आर्च पद्धतीने या मार्गाची बांधणी केली जात होती. या कामादरम्यान काही तरी चूक झाली आणि उन्नत मार्गाचा एक भाग कोसळला असल्याची माहिती एमएसआरडीसीने दिली. आर्च पद्धतीतील पूल, मार्ग दिसायला देखणे असतात. मात्र बांधकामाच्या मजबुतीविषयी प्रश्न आहे. त्यामुळे आता आर्च पद्धतीऐवजी काँक्रीट गर्डर पद्धतीने या मार्गाची उभारणी करण्यात येणार आहे. नव्याने मार्ग उभारावा लागणार असून यासाठी किमान दीड महिना लागण्याची शक्यता आहे. यात कंत्राटदाराची चूक असल्याने आता या नव्याने उभारण्यात येणाऱ्या मार्गाचा खर्च कंत्राटदारालाच पेलावा लागणार आहे. या दुर्घटनेत एकाचा मृत्यू झाल्याची चर्चा आहे. एमएसआरडीसीने मात्र यात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे स्पष्ट केले आहे.

(https://epaper.loksatta.com/c/67704538)



शब्दकोडे- ७१४

आडवी विधाने :
(१) फार मोठे, विशाल
(४) यथेच्छ, मनाची तृप्ती होईपर्यंत
(८) व्रत, नेम
(९) वजनाने हलकी पिके देणारी जमीन
(११) गंध, राहणे
(१२) व्याकूळ, घाबरा, तळमळणारा
(१४) शरीरातील त्रिदोषांपैकी एक
(१६) दरारा, वचक, धाक
(१९) पावाची नळी
(२१) एक औषधी वनस्पती

उभी विधाने :
(१) निरीक्षण, पाहणी
(२) बांबू तीर (३) धंदा, उद्योग
(४) हेतू, मनसुबा (हिन्दी)
(५) नाडी, धमनी, शीर
(६) पोपट, राघू, कीर
(७) विजयादशमी
(१०) दही, ताक घुसळववयाचे साधन
(१३) शब्दभांडाराचे जाडजूड पुस्तक
(१५) भिंतीतले कपाट
(१७) हत्या, वध

सुडोकू - ७१४

(https://epaper.loksatta.com/c/67703856)

Browse More Clips